नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३०९ | Issue - 309 | वार मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ | Blow- Tuesday Date 31 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात गारपीटासह अवकाळी पावसाची हजेरी

## मुसळधार पाऊस, गारपिट आणि वादळी वाऱ्यांनी अनेक जिल्ह्यांना तडाखा; बळीराजा हतबल, पिकांचे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अवकाळी पावसाबाबतचा हवामान विभागाचा अंदाज बऱ्याच दिवसांनी खरा ठरला असून सोमवारी दुपारनंतर महाराष्ट्रामध्ये अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. गारपिटीचा मारा व पडणारा पाऊस यामुळे शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक जण सुरुवातीची काही मिनिटे सुखावला असला तरी अवकाळी पाऊस सतत पडू लागल्याने ठिकठिकाणी पाणी साचण्याच्या घटनांनी व शेतातील पिकांच्या नुकसानीने राज्यातील शेतकरी चिंतातूर झाला आहे.

राज्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असतानाच अचानक अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. दुपारच्या वेळेतच मुसळधार पाऊस, गारपिट आणि वादळी वाऱ्यांनी अनेक जिल्ह्यांना तडाखा दिला असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पुढील ४८ तास राज्यासाठी धोक्याचे असल्याचा इशारा देण्यात आला आहे. पुणे शहरासह भोर तालुक्यात जोरदार पाऊस आणि गारपिट झाली. उत्रौली परिसरात वादळी वाऱ्यासह गारांचा अक्षरशः सडा पडला. अचानक आलेल्या या पावसामुळे उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला असला, तरी काढणीला आलेल्या ज्वारी, गहू आणि हरभरा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.



हडपसर शहराच्या पूर्व भागातील हडपसर, मांजरी आणि महंमदवाडी परिसरात दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अवकाळी पावसाने हजेरी लावली. सुरुवातीला आकाशात दाट ढग जमा होऊन विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह सरी कोसळल्याने कामावरून घरी परतणाऱ्या चाकरमान्यांची तारांबळ उडाली. औद्योगिक वसाहत, पुणे सोलापूर महामार्ग, मांजरी, शेवाळेवाडी, साडेसतरानळी, ससाणेनगर, रामटेकडी, शंकरमठ, वैदुवाडी, महंमदवाडी परिसरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर सखल भागात पाणी साचले होते. खोदलेल्या रस्त्यांच्या परिसरात चिखल व पाण्याची डबकी तयार झाली. त्यातून प्रवास करताना प्रवाशांना कसरत करावी लागली. वादळी वारा व पावसामुळे मगरपट्टा रस्त्याजवळील विशाल पार्क जवळ झाड कोसळल्याची घटना घडली.

जुन्नर तालुक्यात आंबा, गहू, कांदा पिकांचे मोठे नुकसान : जुन्नर शहरासह मीना नदीच्या खोऱ्यात वादळी वाऱ्यासह गारपीट व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची धांदल उडाली. या गारपिटीने शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जवळपास एक तासाहून झालेल्या या पावसाने आंबा, गहू व कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले असून तातडीने पंचनामे करण्याची मागणी सरपंच अमोल भुजबळ, कुलदीप नायकोडी यांसह शेतकऱ्यांकडून केली जात आहे. जुन्नर तालुक्यातील आंब्याचे आगार म्हणून ओळख असलेल्या काले, येणेरे, बेलसर, वडज , दातखिळेवाडी, पारुंडे, कुसूर, चिंचोली या परिसरात झालेल्या गारपिटीमुळे तसेच वादळामुळे आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे कैऱ्या मोठ्या प्रमाणात पडल्याचे दिसून आले. वादळी वारा व गारपिटीमुळे आंबा उत्पादकांच्या उरल्यासुरल्या अपेक्षांवर देखील पाणी पडले आहे. आंबा उत्पादकांचे अर्थकारण संकटात सापडले असून शासनाने आंबा उत्पादकांना दिलासा द्यावा अशी मागणी केली जात आहे.

धुळे, नाशिक जिल्ह्यात गारांचा खच : धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे कांदा, मका, गहू आणि हरभरा पिकांवर परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. नाशिकमध्येही जोरदार वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट झाली. अनेक भागांत गारांचा खच साचल्याचे चित्र दिसून आले. या अचानक आलेल्या अस्मानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. सिन्नर परिसरातही पावसाची नोंद झाली.

## नितीश यांच्या विधान परिषद सदस्यपदाच्या राजीनाम्यानंतर राजकीय खळबळ

नवी दिल्ली: मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज विधान परिषद सदस्यपदाचा राजीनामा दिला. यापूर्वी ते राज्यसभेवर निवडून आले होते. मात्र, बिहारचे मुख्यमंत्री कोण होणार, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे.

नितीश कुमार यांचे निकटवर्ती काही काळापासून घटनात्मक तरतुदींचा हवाला देत असे संकेत देत आहेत की, विधानसभेचे किंवा विधान परिषदेचे सदस्यपद सोडल्यानंतरही एखादी व्यक्ती सहा महिने मुख्यमंत्रीपदी राहू शकते. ज्येष्ठ मंत्री श्रवण कुमार यांच्यासारख्या नेत्यांच्या अशा विधानांमुळे या अटकळांना आणखी खतपाणी मिळाले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये (एनडीए) मुख्यमंत्रीपदासाठी अंतर्गत संघर्ष होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपपेक्षा जेडीयूकडे केवळ चार आमदार कमी असल्याने, भाजप आपल्या मित्रपक्षाकडे नेतृत्व सहजपणे सोपवण्याच्या मनःस्थितीत दिसत नाही. मात्र, एनडीएच्या सूत्रांनुसार, पुढील महिन्याच्या सुरुवातीला राज्यसभेचे सदस्य म्हणून शपथ घेण्याची शक्यता असलेले नितीश कुमार जास्त काळ सत्तेत राहणार नाहीत. त्यांच्या मते, हिंदू पंचांगानुसार अशुभ मानल्या जाणाऱ्या खर्मस महिन्यानंतरच (१४ एप्रिलपर्यंत) नेतृत्वबदल शक्य आहे. भाजपच्या गोटात आपल्या पहिल्या मुख्यमंत्र्याच्या शक्यतेबद्दल उत्साहाचे वातावरण आहे. या प्रमुख हिंदी भाषिक राज्यात जवळपास दोन दशकांपासून सत्तेत भागीदार असूनही, भाजपला अद्याप मुख्यमंत्रीपद मिळवता आलेले नाही. उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, ज्यांच्याकडे गृहखातेदेखील आहे, त्यांना मुख्यमंत्रीपदाचे संभाव्य दावेदार म्हणून पाहिले जात आहे.

## ऐन उन्हाळ्यात पुण्याला पावसाने झोपडले; आयटी पार्कमध्ये साचला बर्फ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : ऐन उन्हाळयात भर दुपारी पावसाने पुण्यात हजेरी लावली. मुसळधार पाऊस, सोसाट्याचा पाऊस आणि गारपिटीने पुणेकरांना चांगलेच झोडपून काढले आहे. पुण्यातील आयटी पार्कमध्ये तर चक्क बर्फ साचला.

महाराष्ट्र हवामान विभागाने राज्यात काही दिवस पावसाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे नागरिकांना हवामान बदलाचा त्रास हा सहन करावा लागणार आहे. पुणे जिल्ह्यातही काही ठिकाणी अशीच परिस्थिती निर्माण झाली. दुपारी अचानक वातावरणात बदल झाला, ढग दाटून आले, सोसाट्याचा वर सुरु झाला, आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली. या कोसळधार सोबत काही ठिकाणी गारपिटही पडली.

पुण्यातील हा पावसाचे अनेक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहेत. गारपीट , मुसळधार पाऊस, जोरदार वारे यामुळे पुणेकरांची त्रेधातिरपीट उडाली आहे. पावसामुळे काही ठिकाणी प्रचंड पाणी साचले, पुण्यातील हिंजवडी या आयटी पार्कमध्ये इतकी गारपीट झाली की पुणे नसून कुठल तरी थंड प्रदेशातील ठिकाण आहे असे भासत आहे. पुण्याच्या आयटी पार्कचा तो व्हायरल होणारा व्हिडीओ पाहून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. पुण्यात आज (३० मार्च २०२६) दुपारी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि भोर तालुक्यात अचानक पावसाने हजेरी लावली. बाणेर, बालेवाडी, औंध, कोथरूड आणि सिंहगड रोड परिसरात सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला, तर काही ठिकाणी गारपीटही झाली.

पावसाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून नागरिकांना आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे पुढील काही तास शहर आणि परिसरात ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे.

## येत्या तीन महिन्यांत 'पीएनजी' साठी अर्ज न केल्यास 'एलपीजी' सिलिंडर बंद





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील ज्या शहरी भागांमध्ये पाइपद्वारे गॅस (पीएनजी) जोडणीची सुविधा उपलब्ध आहे, तिथे नागरिकांनी येत्या तीन महिन्यांत अर्ज करणे बंधनकारक आहे. पीएनजी वाहिनी कार्यान्वित असूनही नागरिक अर्ज करत नसल्यास, त्या भागातील घरगुती गॅस (एलपीजी) सिलिंडरचा पुरवठा बंद केला जाऊ शकतो, असा इशारा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी दिला. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील इंधन पुरावठ्याबाबत सरकारची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. भुजबळ म्हणाले, जागतिक स्तरावर युद्धजन्य परिस्थिती असली, तरी भारतात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता अफवांवर विश्वास ठेवू नये. रशिया आणि व्हेनेझुएला यांसारख्या देशांकडून नियमितपणे इंधन पुरवठा होत असून, भारतीय जहाजांची ये-जा सुरू असल्याने तुटवड्याची कोणतीही शक्यता नसल्याचे भुजबळ यांनी नमूद केले. बाजारातील मागणी लक्षात घेता सरकारने व्यावसायिक वापरासाठीच्या गॅस पुरवठ्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे. एलपीजीचा साठाही मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आला असून, पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना केल्या जात आहेत. ज्या नागरिकांनी पीएनजीसाठी अर्ज केला आहे, मात्र अद्याप त्यांच्यापर्यंत वाहिनी पोहोचलेली नाही, अशा ग्राहकांचा एलपीजी पुरवठा कोणत्याही परिस्थितीत खंडित केला जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. रेशनवर तीन महिन्यांचे धान्य मिळणार इंधन पुरवठ्यासोबतच रेशन धान्याबाबतही सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात धान्याचा पुरेसा साठा असून, नागरिकांना आता तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी घेण्याची मुभा देण्यात आली आहे. याशिवाय, जिथे गॅसची सुविधा कमी आहे, तिथे केरोसीन उपलब्ध करून दिले जाणार आहे. पीएनजी वाहिनी टाकण्यासाठी आता स्वतंत्र परवानग्यांची गरज भासणार नाही, सरकारच ही प्रक्रिया सुलभ करणार आहे. पीएनजी हा सुरक्षित आणि स्वस्त पर्याय असून त्याचा विस्तार करणे काळाची गरज आहे. त्यामुळे उपलब्ध सुविधा असलेल्या भागातील नागरिकांनी तातडीने अर्ज करावेत, असे आवाहन मंत्री भुजबळ यांनी केले. त्याचप्रमाणे राज्यात कोणत्याही प्रकारचा लॉकडाऊन लागू होणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### मंत्री छगन भुजबळ यांचा इशारा; व्यावसायिक वापरासाठीच्या गॅस पुरवठ्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढ

### गडचिरोलीतील 'सी-६०' जवानांना विशेष पदक जाहीर

## पुढील सहा महिन्यांत 'एफआयआर'पासून 'चार्जशीटपर्यंत'ची सर्व प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र पोलीस दलाला तंत्रज्ञानाने अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. गुन्हेगारी तपासात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) आणि 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून, पुढील सहा महिन्यांत एफआयआरपासून ते दोषारोपपत्रापर्यंतची (चार्जशीट) सर्व प्रक्रिया पूर्णपणे 'डिजिटाइज' करण्याचे आदेश दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली.

मुंबईतील पोलीस महासंचालक कार्यालयात सोमवारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद पार पडली. या परिषदेला संबोधित केल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा कृती आराखडा मांडला. केंद्र सरकारने राज्यांच्या तांत्रिक प्रगतीसाठी दिलेल्या १०६ मुद्द्यांच्या पालनात महाराष्ट्र अग्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. आता आपण पुराव्यांच्या व्यवस्थापनासाठी 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत. यामुळे डिजिटल पुराव्यांची सुरक्षितता वाढेल आणि त्यात कोणताही बदल करणे कोणालाही शक्य होणार नाही. ही यंत्रणा येत्या सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये कार्यान्वित करण्याच्या सूचना पोलीस महासंचालकांना देण्यात आल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

राज्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण (कॉन्व्हिक्शन रेट) सध्या ५० टक्क्यांच्या आसपास आहे, ते ९५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. यासाठी गेल्या ४ ते ५ वर्षांतील प्रकरणांचे 'एआय'च्या माध्यमातून विश्लेषण करण्याचे काम गुन्हे अन्वेषण विभागाला (सीआयडी) सोपवण्यात आले आहे. विशेषतः सत्र न्यायालयांमधील निकालांमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष रणनीती आखली जात असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

२४४ पोलिसांनी दिले बलिदान : गडचिरोलीत माओवादाचा बीमोड करताना आमच्या २४४ पोलिसांनी बलिदान दिले आहे. त्यांच्या शौर्याची दखल घेत, ज्या जवानांनी 'सी-६०' दलात किमान ३ वर्षे सेवा बजावली आहे, त्या सर्वांना 'सी-६० पदक' देऊन सन्मानित करण्याचा



निर्णय सरकारने घेतला आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अंमली पदार्थांविरोधात मोहीम : राज्यातील तरुण पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी 'ड्रग्ज फ्री कॅम्पस' ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. अंमली पदार्थांच्या तस्करी आणि विक्रीविरुद्ध राज्यात लवकरच एक मोठी मोहीम उघडली जाईल. पोलीस महासंचालक यासंदर्भातील सविस्तर रणनीती लवकरच सादर करणार आहेत, असे फडणवीस म्हणाले.

अपघात रोखण्यासाठी 'नागपूर मॉडेल' : रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी नागपूरमध्ये राबवण्यात आलेल्या प्रायोगिक मॉडेलमुळे तेथील अपघातांत ३० टक्क्यांनी घट झाली आहे. हेच यशस्वी 'नागपूर मॉडेल' आणि मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील प्रयोगांच्या धर्तीवर संपूर्ण राज्यात अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## संपादकीय....

# पारदर्शकता आणि वेग

महाराष्ट्र पोलीस दलाला तंत्रज्ञानाने अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. गुन्हेगारी तपासात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) आणि 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून, पुढील सहा महिन्यांत एफआयआरपासून ते दोषारोपपत्रापर्यंतची (चार्जशीट) सर्व प्रक्रिया पूर्णपणे 'डिजिटाइज' करण्याचे आदेश नुकतेच मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. मुंबईतील पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद पार पडली. या परिषदेला संबोधित केल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा कृती आराखडा मांडला. केंद्र सरकारने राज्यांच्या तांत्रिक प्रगतीसाठी दिलेल्या १०६ मुद्द्यांच्या पालनात महाराष्ट्र अग्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. आता आपण पुराव्यांच्या व्यवस्थापनासाठी 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत. यामुळे डिजिटल पुराव्यांची सुरक्षितता वाढेल आणि त्यात कोणताही बदल करणे कोणालाही शक्य होणार नाही. ही यंत्रणा येत्या सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये कार्यान्वित करण्याच्या सूचना पोलीस महासंचालकांना देण्यात आल्या आहेत. राज्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण (कॉन्व्हिक्शन रेट) सध्या ५० टक्क्यांच्या आसपास आहे, ते ९५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. यासाठी गेल्या ४ ते ५ वर्षांतील प्रकरणांचे 'एआय'च्या माध्यमातून विश्लेषण करण्याचे काम गुन्हे अन्वेषण विभागाला (सीआयडी) सोपवण्यात आले आहे. विशेषतः सत्र न्यायालयांमधील निकालांमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष रणनीती आखली जात आहे. गडचिरोलीत माओवादाचा बीमोड करताना आमच्या २४४ पोलिसांनी बलिदान दिले आहे. त्यांच्या शौर्याची दखल घेत, ज्या जवानांनी 'सी-६०' दलात किमान ३ वर्षे सेवा बजावली आहे, त्या सर्वांना 'सी-६० पदक' देऊन सन्मानित करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. राज्यातील तरुण पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी 'ड्रग्ज फ्री कॅम्पस' ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. अंमली पदार्थांच्या तस्करी आणि विक्रीविरुद्ध राज्यात लवकरच एक मोठी मोहीम उघडली जाईल. पोलीस महासंचालक यासंदर्भातील सविस्तर रणनीती लवकरच सादर करणार आहेत. रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी नागपूरमध्ये राबवण्यात आलेल्या प्रायोगिक मॉडेलमुळे तेथील अपघातांत ३० टक्क्यांनी घट झाली आहे. हेच यशस्वी 'नागपूर मॉडेल' आणि मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील प्रयोगांच्या धर्तीवर संपूर्ण राज्यात अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जाणार आहेत.

# आरोग्य डेटा सुरक्षिततेकडे ठोस पावले; रुग्ण हक्कांना केंद्रस्थानी ठेवण्यावर भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रुग्ण हा आपल्या वैद्यकीय माहितीचा खरा मालक असून, त्या डेटाचे संरक्षण, योग्य वापर आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी संतुलित व मजबूत यंत्रणा उभारण्याची गरज आरोग्य क्षेत्रातील डेटा सुरक्षितता आणि सार्वभौमत्व या विषयावरील चर्चासत्रात तज्ज्ञांनी अधोरेखित केली. सुरक्षित डेटा व्यवस्थापन, स्पष्ट संमती आणि जागतिक स्तरावर विश्वासार्ह देवाणघेवाण यामुळे आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि भविष्याभिमुख होऊ शकते, असा संदेश या चर्चासत्रातून देण्यात आला.

मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथील 'पल्स २०२६' परिषदेत वैद्यकीय डेटा सार्वभौमत्व या विषयावर आयोजित केलेल्या या चर्चासत्रात एआरटीपार्कचे कार्यक्रम संचालक (आरोग्य) डॉ. भास्कर राजकुमार, जागतिक आरोग्य संघटनेचे प्रादेशिक सल्लागार (डिजिटल हेल्थ व कृत्रिम बुद्धिमत्ता) डॉ. कार्तिक अडपा, ॲगिलस डायग्नोस्टिक्सचे अध्यक्ष व मार्गदर्शक डॉ. अविनाश फडके, तसेच नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या शैक्षणिक व संशोधन प्रमुख डॉ. अश्विनी जोगाडे पांढरे यांनी सहभाग घेतला. जागतिक नवकल्पनांना चालना देताना आरोग्यविषयक डेटाचे संरक्षण करणे याबाबत तज्ज्ञ मान्यवरांनी यावेळी मत नोंदविले. जागतिक बँकेचे वरिष्ठ परिचलन अधिकारी राहुल पांडेय यांनी सत्राचे समन्वयन केले.

एआरटीपार्कचे कार्यक्रम संचालक (आरोग्य) डॉ. भास्कर राजकुमार यांनी आरोग्य क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर तयार होणाऱ्या डेटाच्या सुरक्षेवर भर दिला. जगातील सुमारे ३० टक्के डेटा हा आरोग्याशी संबंधित असल्याने त्याचा गैरवापर झाल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. डेटा हा वाहणाऱ्या नदीसारखा नसून वाचनालयासारखा समजावा आणि त्याभोवती कडक सुरक्षा असावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. त्यांनी ''त्रिस्तरीय लॉक प्रणाली''ची संकल्पना मांडत रुग्ण हा आपल्या वैद्यकीय नोंदींचा मालक, संस्था ही त्या नोंदी तयार करणारी आणि सरकार हे त्या डेटाचे संरक्षण करणारे असल्याचे स्पष्ट केले. या डेटामध्ये प्रवेश मिळवण्यासाठी आ-ळख पडताळणी, परवानगी आणि सुरक्षा उपाय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. राजकुमार यांनी डेटा सार्वभौमत्वासाठी तीन स्तरांवरील जबाबदाऱ्याही स्पष्ट केल्या. रुग्णांना त्यांच्या संमतीबाबत स्पष्ट माहिती देणारी मजबूत व्यवस्था आवश्यक आहे. संस्थांनी केवळ नाव किंवा फोन नंबर काढून टाकणे म्हणजे डेटा सुरक्षित झाला असे समजू नये, याची जाणीव ठेवावी. सरकारसमोरही डेटा परदेशात साठवणे, क्लाउडचा वापर, तसेच डेटा कुठे ठेवावा यासंबंधी महत्त्वाचे प्रश्न असल्याचे त्यांनी नमूद केले. जागतिक आरोग्य संघटनेचे प्रादेशिक सल्लागार (डिजिटल हेल्थ व कृत्रिम बुद्धिमत्ता) डॉ. कार्तिक अडपा यांनी आरोग्य माहितीचा वापर, त्याचे लाभार्थी आणि सुरक्षा यासाठी स्पष्ट चौकट आवश्यक असल्याचे सांगितले. डेटा थांबवण्यापेक्षा त्याचा सुरक्षित आणि योग्य वापर महत्त्वाचा असल्यावर त्यांनी भर दिला. भारताने सार्वभौम, मुक्त आणि सहकार्यात्मक डेटा व्यवस्थापन स्वीकारावे, असे ते म्हणाले. उपचारासाठी वापरला जाणारा डेटा आणि संशोधन किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता विकासासाठी वापरला जाणारा डेटा यामध्ये स्पष्ट फरक असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. संवेदनशील आरोग्य माहिती गळतीचे धोकेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. यासाठी सध्याच्या डेटा संरक्षण कायद्याबरोबरच स्वतंत्र आरोग्य-डेटा नियमांची गरज असल्याचे नमूद करत, भविष्यात देशांदरम्यान सुरक्षित आणि विश्वासार्ह आरोग्य माहितीची देवाणघेवाण होणे ही महत्त्वाची दिशा असल्याचे डॉ. कार्तिक अडपा यांनी सांगितले. ॲगिलस डायग्नोस्टिक्सचे अध्यक्ष व मार्गदर्शक डॉ. अविनाश फडके यांनी रुग्णाला स्वत:च्या वैद्यकीय माहितीसाठी पूर्ण हक्क असलेली व्यक्ती मानण्याची गरज व्यक्त केली.



# नंगपूरामुर्रीच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या शासकीय निवासी शाळेत मोफत प्रवेश सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोर्दिया : नवीन शैक्षणिक सत्र २०२६-२७ या वर्षासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरामुर्री येथील शाळेत मागासवर्गीय प्रवर्गातील मुलांसाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय गोदिया अंतर्गत सदर शाळा चालविल्या जात आहेत. यामध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज वितरण दि. ०१ एप्रिल ते १५ जून २०२६ पर्यंत देण्यात येत असून गरजू, हुशार विद्यार्थ्यांनी या मोफत प्रवेश प्रकियेचा लाभ घ्यावा.

**समाज कल्याण विभागाचे नाविन्यपूर्ण उपक्रम : एस. सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी**

प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला (टी सी) गुणपत्रक (मार्कशिट), जातीचा दाखला (मुलीचा नसल्यास आई-वडील, भाऊ-बहिण), आधार कार्ड झेरॉक्स, पासपोर्ट फोटो (६ प्रती)

शाळेची वैशिष्ट्ये दरवर्षी १० वीचे निकाल १००% असते. मानांकित शाळा, परसबाग, नियमित योगा व एरोबिक्स, नियमित रात्रकालीन अभ्यास वर्ग, क्रॉसवर्ड ग्रंथालय, भाषा ग्रंथालय (डरपर्सीरसश डरल) शाळांमध्ये उपलब्ध मोफत सोई-सुविधा अध्यापनासाठी प्रशिक्षित व अनुभवी शिक्षक वर्ग, मोफत शैक्षणिक साहित्य उपलब्ध व डिजीटल क्लास रूम, ग्रंथालय, प्रयोगसाहित्यानी सुसज्ज प्रयोगशाळा, शाळेसाठी भव्य क्रिडांगणासहित क्रिडासाहित्य व ग्रीन जिम, सुसद्ध संगणक कक्ष व इंटरनेट सुविधा, विविध वाद्य साहित्याने समृद्ध संगीत कक्ष, मनोरंजन व शैक्षणिक माहिती करीता रंगीत



दुरचित्रवाणी, शालेय मण-वेश, नाईट सुट व क्रिडा ट्रॅक सुट, सर्व शैक्षणिक साहित्य व पाठ्यपुस्तके, शुद्ध पिण्याचे पाणी, वासिंग मशीन कपडे धुण्यासाठी, जेवणा साठी डायनिंग टेबल व्यवस्था, उत्कृष्ट भोजन, नाश्ता, दूध, अंडी, फळे व्यवस्था, आंथरूण-पांघरूण साहित्य उपलब्ध, आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था (वॉटर हिटर), प्रशिक्षित सुरक्षारक्षक व सफाई कर्मचारी, ती ती टी व्ही सुरक्षा, सुसज्ञ्ज गणित प्रयोगशाळा इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

शाळेत प्रवेश घेण्यासाठी सहाय्यक आयुक्त किशोर भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या नेतृत्वाखाली शाळेतील शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी, नीता भलमे, प्रदीप ढवळे, पी. एल. लांजेवार, साधना पारधी, आशिष शहारे, तुषार महाजन यांच्याशी संपर्क साधावा आणि आपले प्रवेश निश्चित करावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

# कालकथित उत्तम (अण्णा) धिवार यांचा प्रथम पुण्यदिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तात्या धिवार यांचे मोठे बंधू आणि खानवडी गावचे रहिवासी कालकथित उत्तम (अण्णा) धिवार यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन महात्मा फुले सभागृह खानवडी येथे साजरा करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा

जोतिराव फुले व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला धिवार कुटुंबियांच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर महाकारूणी तथागत भगवान गौतम बुद्ध, महामानव विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि कालकथित उत्तम अण्णा

धिवार यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून बौद्धाचार्य दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध धम्मानुसार धार्मिक विधी पार पाडण्यात आला. यावेळी बौद्धाचार्य दादा गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे महादेव कांबळे व सुरेश रणपिसे यांनी सुत्तपठनाचा कार्यक्रम पार पाडला. त्रिशरण पंचशील, पुण्यानुमोदन गाथा यांचे वाचन करण्यात आले. त्यानंतर अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. अभिवादन सभेच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पक्षाचे जेष्ठ नेते विष्णू दादा भोसले होते. अभिवादन सभेत विविध मान्यवरांकडून श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी अनेक मान्यवरांनी कालकथित उत्तम अण्णा धिवार यांचा जीवनपट उलगडला. उत्तम अण्णा यांच्या स्मृती जागवत असताना त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. यामध्ये प्रामुख्याने उत्तम अण्णांचे कुटुंब विषय असणारे प्रेम, माया आणि जिव्हाळा याविषयी माहिती दिली. उत्तम अण्णा म्हणजे एक आदर्श व्यक्तिमत्व होते. पोलीस खात्यात नोकरी अत्यंत प्रामाणिकपणे केली. कोणताही भ्रष्टाचार त्यांनी केला नाही. आई वडील, भावंडे, बहिणी आणि पत्नी यांच्या विषयी प्रचंड प्रेम असणार हे व्यक्तिमत्व आज आपल्यात नाही याची खंत कुटुंबपूरती मर्यादित न राहता संपूर्ण गावालाच लागलेली आहे. अध्यक्षीय भाषणामध्ये विष्णू दादा भोसले म्हणाले की, आज बहुजन हक्क परिषदेच्या माध्यमातून सुनिल तात्या धिवार जे समाज कार्य करत आहे त्याचे श्रेय आई-वडिलांबरोबरच उत्तम अण्णांना जाते. सुनिल तात्या यांच्या जडणघडणीमध्ये उत्तम अण्णांचा सिंहाचा वाटा आहे. उत्तम अण्णांनी एक आदर्श कुटुंब निर्माण केले. त्यामध्ये त्यांचा मोठा मुलगा ज्ञानदीप वेल्हा पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून चांगल्या प्रकारे काम करत आहे,दुसरा मुलगा दीपक धिवार पुणे येथे अग्निशमन दलात कार्यरत आहे, मुलगी दिपाली गंगावणे आरोग्य सेवेमध्ये आरोग्य सेविका म्हणून काम करत आहे तर दुसरी मुलगी रूपाली मोरे या माळगाव पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून काम पाहत आहेत. अशाप्रकारे एक आदर्श कुटुंब त्यांनी घडविले. बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तात्या धिवार यांनी मोठे बंधू कालकथित उत्तम अण्णा यांच्या विषयी आठवणी सांगताना मनोगत व्यक्त केले की अण्णांनी घर एकत्र रहावे, कुटुंब एकत्र रहावे म्हणून पंधरा वर्षे खानवडी ते पुणे ग्रामीण पोलीस मुख्यालय असा प्रवास करून नोकरी केली. सकाळी सात वाजता सायकल वरून ते सासवडला जात असत. सासवडला सुनील मुळीक यांचे सायकल दुकान श्रीराम सायकल मार्ट येथे सायकल लावून सासवड एसटी स्टँड वरून एसटीने पुणे स्टेशनला जात असे. पुणे स्टेशन वरून ते पाषाण मार्ग जाणारी बस पकडून पुणे ग्रामीण पोलीस मुख्यालय चव्हाण नगर येथे जात असत. संध्याकाळी सहा वाजता कामाची सुट्टी झाल्यानंतर परतीचा प्रवास चालू व्हायचा. घरी यायला त्यांना रात्रीच्या नऊ वाजायच्या. पुन्हा सकाळी साडेपाचला उठून कामासाठी तीच धावपळ. तीच वसवस. फक्त माझं कुटुंब एकत्र रहावे. त्यांनी पंधरा वर्षे हा प्रवास केला.त्यांनी ठरवले असते तर ते पत्नीला घेऊन पुण्यामध्ये राहू शकले असते परंतु त्यांनी तसे न करता आई-वडिलांसोबत आणि भावंडांसोबत पत्नीला घेऊन पंधरा वर्ष त्रास सहन करून कुटुंबाला प्रेम दिले. बदली जेव्हा बारामतीला झाली तेव्हाच ते कुटुंबासह बारामतीला राहिला गेले. तरी सुद्धा एकही शनिवार रविवार असा चुकला नाही की ते आई बापू आणि मला भेटायला खानवडीला आले नाहीत असे झालेच नाही. कसं राहायचं, असं वागायचं हे मला अण्णांनी शिकवले. मी अण्णांचा खूप लाडका होतो. असा हा आज माझा मोठा भाऊ माझ्याबरोबर नाही याचे माझ्यासह माझ्या कुटुंबीयांना खूप मोठी उणीव भासत आहे. अण्णा तुम्ही जरी आज आमच्यात नसले तरी तुम्ही दिलेल्या संस्काराच्या शिदोरीवर आम्ही निश्चितच सर्वजण वाटचाल करू असा आज तुमच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त तुम्हाला शब्द देतो.

प्रथम पुण्यस्मरण दिन कार्यक्रमांमध्ये पुरंदर तालुक्यासह पुणे जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये प्रामुख्याने पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जी जगताप, पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य अजय इंगळे,सासवड नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष वामन तात्या जगताप, पुणे जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य रमेश आबा इंगळे, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाच्या सचिव नंदकुमार सागर, राष्ट्रपती पारितोषिक विजेते माजी मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे, पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे, रावसाहेब पटवर्धन विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज चे प्राचार्य अनिल कांबळे, पुरंदर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य इस्माईल सय्यद, कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे बीएमसी चे प्राचार्य वसंत धिवार,सेवा निवृत्त फॉरेस्ट अधिकारी शिवाजीराव फुले, गुरुकुल अॅकॅडमीचे संस्थापक संदीप टिळेकर, सासवड नगरपालिकेचे नगरसेवक, सोपान रणपिसे , नगरसेवक प्रमोद टकले, ज्येष्ठ विधीतज्ञ ड.विजय भालेराव, उद्योजक प्रकाश काटे, उद्योजक आनंद कांबळे, टेल्को युनियनचे नेते सुधाकर कडलाख, हवेली माजी सदस्य पंचायत समिती सदस्य जितीन कांबळे, उद्योजक दीपक कुंजीर, सेवानिवृत्त अभियंता बाळासाहेब कांबळे, सर्कल भाऊसाहेब संजय बडदे, तलाठी भाऊसाहेब सुरेश जगताप, मांजरी गावचे पोलिस पाटील भोसले वंचित बहुजन आघाडीचे नेते संजय भालेराव, बहुजन चळवळीतील मुलुख मैदानी तोफ श्रीकांतदादा होवाळ, परिवर्तन क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल दादा लोंढे,वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते संदीप बेडकर, कृषी उत्पन्न बाजार समिती नीरा मार्केट कमिटीचे सदस्य गणेश होले, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सेवानिवृत्त अधिकारी विजय कांबळे, बहुजन हक्क परिषदेचे उपाध्यक्ष शशीभाऊ गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र होले, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश पवार, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय ढावरे ैद्धाचार्य बाळासाहेब पोळ, जितेंद्र पोळ, बहुजन हक्क परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे सचिव कैलास धिवार, बहुजन हक्क परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे युवक अध्यक्ष नाना साहेब मदने, सामाजिक कार्यकर्ते महादेवजी भोंडे, पुणे जिल्हाध्यक्ष केशव दादा भोसले, पुणे जिल्हा युवक अध्यक्ष संतोष डुबल, पळशी गावचे सरपंच माणिक आबा काळे, उद्योजक विकास जाधव, आरपीआयचे बारामती तालुकाध्यक्ष विश्वास भोसले, पुरंदर तालुका आरपीआय चे अध्यक्ष बळीराम सोनवणे,बी. जे.पी चे युवा नेते अमोल जगताप, दैनिक पुण्यनगरी चे पत्रकार योगेशजी भोसले, यश एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक प्रकाश जगदाळे, झी टीव्ही फेम जादूगार शिवम माने, होम मिनिस्टर फेम आकाश वाघमारे, उद्योजक सुभाष अण्णा सूर्यवंशी, मांजरी गावचे पोलीस पाटील अमोल, भोसले, शिक्षक योगेश घोरपडे, बहुजन हक्क परिषदेचे संघटक सचिन गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते कांता भोंडे, पत्रकार कृष्णा फुलावरे, एखतपूर मुंजवडीचे उपसरपंच तुषार झुरुंगे, वाळुंज गावचे माजी उपसरपंच गोविंद इंगळे, निल इंगळे, उद्योजक महेंद्र इंगळे, अतुल जगताप, संभाजी राजे जगताप, कृषी अधिकारी सुनिल जगताप, श्रमिक ब्रिगेडचे अध्यक्ष सुधीर साळवे, माजी मुख्याध्यापक रामकृष्ण वाघमारे, बौद्धाचार्य बाळासाहेब पोळ, जितेंद्र पोळ, उद्योजक रोहिदास होले, खानवडी गावचे उपसरपंच अॅड. स्वप्निल होले, माजी सरपंच चंद्रकांत फुले, माजी आदर्श सरपंच,रवींद्र फुले, नितीन होले, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य योगेश रासकर, खानवडी गावचे पोलीस पाटील सचिन होले, माजी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय होले, माजी सरपंच भाऊसाहेब




खोमणे, माजी सरपंच नितीन होले, बहुजन हक्क परिषद चे संघटक शरद नेटके, रामभाऊ नेवसे, मल्हारी होले, उद्योजक गणेश होले, उद्योजक राजेंद्र फुले, प्रमोद डेंगळे, पत्रकार अक्षय कोलते, माजी तंटामुक्ती अध्यक्ष बाळासाहेब होले, ज्येष्ठ नागरिक तात्या नेवसे, ज्ञानदेव होले, लक्ष्मण होले, मोहन फुले, बहुजन हक्क परिषदेचे संघटक गणेश गरदडे, प्रा.बालाजी नाटकर, पुरंदर तालुका संघटक भिकाजी धिवार, बहुजन हक्क परिषदेचे खळद शाखा अध्यक्ष सोमनाथ कांबळे, गुळूंचे शाखेचे अध्यक्ष संतोष गायकवाड, देगावचे माजी सरपंच अण्णा शेलार, यासह अनेक आप्तेष्ट नातेवाईक मित्रपरिवार, विविध गावचे सरपंच, उपसरपंच पदाधिकारी, विविध संघटनांचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते, पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते व धिवार कुटुंबावर प्रेम करणारा मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

यावेळी धिवार कुटुंबियांच्या वतीने अन्नदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांच्यावतीने उत्तम अण्णांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सांगता धम्मपालन गाथेने करण्यात आली. यावेळी सर्व उपस्थितांचे आभार ज्ञानदीप धिवार यांनी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निफाड खून प्रकरणात नागरिकांचे धाडस ठरले 'गेम चेंजर'; पोलिस तपासाला मिळाली विजेची गती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : २३ मार्च २०२६ रोजी निफाड पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या थरारक खून प्रकरणाच्या तपासात स्थानिक नागरिकांनी दाखवलेले अतुलनीय धाडस हेच या गुन्ह्याच्या उकलचे खरे शस्त्र ठरले. जीवाची पर्वा न करता संकटाला सामोरे जाणाऱ्या या नागरिकांमुळे पोलिस तपासाला अक्षरशः पंख फुटले असून संपूर्ण परिसरात त्यांच्या शौर्याची जोरदार चर्चा रंगली आहे.

सनी गीताराम पवार, बापू भाऊसाहेब जेऊघाले, अंकुश लक्ष्मण भोसले, संदीप राजाराम जाधव आणि अविनाश संजय माळी यांनी मृत्यूच्या सावटाखाली सुरू असलेल्या शोधमोहीमेत थेट उडी घेतली. विहिरीच्या काळोखात उतरून मृतदेह बाहेर काढणे, तसेच कॅनॉल आणि तलाव परिसरात जीव धोक्यात घालून शोधमोहीम राबवणे, हे अत्यंत कठीण आणि अंगावर काटा आणणारे काम त्यांनी निर्धाराने पार पाडले.





या धाडसी मोहिमेमुळे पोलिसांना महत्त्वाचे धागेदोरे मिळाले आणि गुन्ह्याच्या उकल प्रक्रियेला निर्णायक वेग प्राप्त झाला. नागरिकांच्या या निःस्वार्थ योगदानामुळेच तपासाची दिशा स्पष्ट झाली, असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

या शौर्यगाथेची दखल घेत निफाड पोलीस स्टेशनतर्फे सर्व धाडसी नागरिकांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी ठाम शब्दांत सांगितले, सजग, धाडसी आणि जबाबदार नागरिक हेच पोलीस दलाचे खरे बळ आहे. अशा सहकार्यामुळेच गुन्हेगारीवर प्रभावी लगाम बसू शकतो.

सदर कार्यक्रमात सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल फडोळ, पोलीस नाईक नितीन सांगळे, पोलीस हवालदार नितीन साळवे, कपालेश्वर ढिकले, महिला पोलीस नाईक मनीषा गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल अरविंद ढवळे, धनंजय जाधव, राजेंद्र दरोडे, धनंजय बैरागी, विक्रम लहाने, विनोद जाधव आणि योगेश आव्हाड यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र पोलीस विभागाकडून सर्व सत्कारमूर्तींना सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांच्या धाडसाचा गौरव करण्यात आला. भविष्यातही नागरिक आणि पोलीस यांच्यातील हे सशक्त सहकार्य असेच कायम राहील, अशी आशा यावेळी व्यक्त करण्यात आली.

निफाडच्या भूमीत पुन्हा एकदा सिद्ध झाले – संकटाच्या क्षणी उभा राहणारा सामान्य माणूसच खरा 'हिरो' असतो!




# मंगळवेढा बस स्थानकावर दुपारी धाडसी सोनसाखळी चोरी: प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळा बस स्थानकावर सोमवारी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास भर दुपारी धाडसी चोरीची घटना घडली. सोलापूर कडे जाणाऱ्या एसटी बस मध्ये चढत असताना एका महिलेच्या गळ्यातील अंदाजे दीड तोळ्याची सोन्याची गंठण आज्ञा चोरट्याने क्षणार्धात हिसकावून नेली. या प्रकरणामुळे बस स्थानकात परिसरात एकच खळबळी उडाले असून प्रवासी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे सोमवार हा आठवडे बाजाराचा दिवस असल्याने बस स्थानकावर नेहमीप्रमाणे मोठी गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत चोरट्याने पुन्हा एकदा आपल्या डाव सध्याची चर्चा घटनास्थळी सुरू होत आहे विशेष म्हणजे बस मध्ये चढताना महिलेच्या दागिन्यावर डल्ला मारण्याचा घटना यापूर्वी अनेकदा घडल्या आहेत.

मागील वर्षी एका पोलीस कर्मचाऱ्यांच्या पत्नीची दागिने जी पर्स चोरीला गेली होती त्या प्रकरणाचा ही अद्याप मुलगा न झालेले नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांच्या घरातीलच चोरी उघडकीस येत नसेल तर सर्वसामान्य ची काय? असा संतप्त सवाल प्रवासी नागरिकाकडून उपस्थित केला जात आहे.

गेल्या वर्षभरात अशा प्रकारच्या घटनांमध्ये एकही चोरट्याला पकडण्यास स्थानिक पोलिसांना यश आले नसलेली चर्चा असून त्यामुळे पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले खाकी वर्दीचा १० कमी होत चालल्याचे चित्र स्पष्ट दिसून आल्याची टिकाऊ होत आहे. दरम्यान मंगळवेढात अवैद्य व्यवसायावर कारवाई करण्यासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या पथकाला वारंवार धाव घ्यावी लागत आहे मग स्थानिक पोलीस स्टेशन नेमकी कशासाठी असा थेट सवाल संततुन नागरिकाकडून केला जात आहे या घटनेनंतर बस स्थानक परिसरात पोलिस बंदोबस्त वाढवण्याची झी टीव्ही यंत्रणा सक्षम करण्याची मागणी जोर धरू लागली आहे संबंधित महिन्याने पोलिसात तक्रार दाखल केल्या असून पुढील तपास सुरू असलेली समजते.

# कॉरिडॉर स्थगितीवरून सभेत सत्ताधारी व विरोधी नगरसेवकांमध्ये खडाजंगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरामध्ये येणाऱ्या भाविकांना सुख सुविधा चांगल्या मेळाव्यात यासाठी शासनाने पंढरपुरात कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कॉरिडॉरच्या विषयावरून सत्ताधारी व विरोधी नगरसेवक मध्ये खडा जंगी झाले आहे

पंढरपूर नगर परिषदेची सर्वसाधारण सभा छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये सोमवार सकाळी अकरा वाजता लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. सौ. प्रणिता भालके यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. वरचेवर पंढरपूरमध्ये येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे. त्यामुळे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुख सुविधा देण्यासाठी कॉरिडोर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. मात्र कॉर्डरला स्थानिक नागरिकांमधून विरोध होत आहे. त्यामुळे हा विषय नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये आला असता. यामुळे सत्ताधारी नगरसेवक व विरोधी नगरसेवकांमध्ये खाडा जिंकली उडाली.

ठेकेदाराचे ४१ कोटी रुपये देणे

पंढरपूर नगरपरिषदेने शोध पत्रिका काढावी अशी मागणी नगरसेवकांनी केली आहे.

# दररोज शिर्डीत परिक्रमा करणारे हरिश्चंद्र आणि बाली; भक्तीचा अनोखा प्रवास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शिर्डी : साईबाबांच्या पवित्र तपोभूमीत एक आगळावेगळा भक्तिमय उपक्रम सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. बीएसएनएलचे निवृत्त अधिकारी हरिश्चंद्र गवारे आणि दिल्लीहून आलेले योगेश बाली हे दोघे दररोज पहाटे शिर्डीत १५ किलोमीटरची परिक्रमा करत साईभक्तीत तल्लीन होत आहेत.

शिर्डीत दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात 'शिर्डी परिक्रमा' मोठ्या उत्साहात पार पडते. या परिक्रमेकरिता देश–विदेशातून तीन ते चार लाख भाविक सहभागी होतात. मात्र, गवारे आणि बाली यांनी या वार्षिक परंपरेला दररोजच्या साधनेचे रूप दिले आहे.

दररोज काकड आरतीच्या वेळी हे दोघे खांद्यावर ध्वज आणि छोटेखानी माईक सिस्टम घेऊन ॐ साई नमो नमः च्या गजरात परिक्रमेचा प्रवास सुरू करतात. त्यांच्या हातातील वीणेच्या सुरात आणि नामस्मरणात १५ किलोमीटरचा प्रवास भक्तिमय वातावरणात पूर्ण होतो. या प्रवासात मार्गात अनेक भाविकही त्यांच्यात सहभागी होत असल्याने वातावरण अधिकच उत्साहपूर्ण बनते.

लक्ष्मी मंदिर शिर्डी येथे परिक्रमेच्या समाप्तीनंतर बोलताना हरिश्चंद्र गवारे यांनी सांगितले की, निवृत्तीनंतर रोज सकाळी चालण्याची सवय होती. त्याचाच उपयोग साईसेवेसाठी करावा या भावनेतून दोन वर्षांपूर्वी परिक्रमा सुरू केली.

गवारे यांच्या या भक्तीभावाने प्रेरित होऊन योगेश बाली गेल्या सहा महिन्यांपासून त्यांच्या सोबत परिक्रमा करत आहेत. या प्रवासात मिळणारे भक्तिमय वातावरण आणि इतर भाविकांचे सहकार्य आमचा उत्साह अधिक वाढवत आहे, असे बाली यांनी सांगितले.

दरम्यान, यापूर्वी काही भाविकांकडून एकादशी आणि गुरुवारी परिक्रमा करण्याची परंपरा गेल्या १६ वर्षांपासून सुरू होती. मात्र, गवारे आणि बाली यांनी या परंपरेला नवे स्वरूप देत दररोजची परिक्रमा सुरू केली आहे.

ही परिक्रमा कधीपर्यंत सुरू राहणार? या प्रश्नावर दोघेही एकच उत्तर देतात – जसे साईबाबांची इच्छा असेल, तसे आम्ही चालत राहू.




साईभक्तीचा हा अनोखा आणि प्रेरणादायी प्रवास शिर्डीत येणाऱ्या भाविकांसाठी श्रद्धेचा नवा आदर्श ठरत आहे.

# वेळापूर येथे स्व. सूर्यकांत दादा माने देशमुख यांची पुण्यतिथी साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वेळापूर तालुका माळशिरस येथे सोलापूर जिल्हा परिषदेची माजी उपाध्यक्ष स्वर्गीय सूर्यकांत दादा माने देशमुख यांची १९ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रारंभी स्वर्गीय सूर्यकांत दादा माने देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे व नूतन जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत जाधव यांच्या हस्ते करण्यात आली तसेच कैलासवाची सूर्यकांत दादा माने देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त सुरू करण्यात आलेल्या पानफुगीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.





यावेळी अशीच कांबळे, चंद्रकांत जाधव, यशस्वी महिला व्यवसायिक श्रीमती अश्विनी दादासो माने या सर्वांचा सन्मान करण्यात आला यावेळी स्वर्गीय सूर्यकांत दादा माने देशमुख यांच्या आठवणीचा केलेल्या कामाचा अनेकांनी उजाळा दिला.

या कार्यक्रमाला महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख सोसायटीचे चेअरमन अमरसिंह माने देशमुख माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब दहिंजे आनंदराव माने देशमुख बाळासाहेब माने देशमुख सुभाष जगताप जयराज माने पाटील वीरकुमार जोशी बाप्पा पाटील दत्तात्रय माने गोपाळ घाडगे संदीप माने देशमुख पिनू येडगे मेजर शशिकांत शिंदे पांडुरंग घाडगे पांडुरंग पानसे उमेश पाखरे सुनील गायकवाड शैलेश बकरी विष्णुपंत वाघे प्रशांत धोत्रे श्रीधर देशपांडे प्रवीण चव्हाण अशोक साबळे हरी मिटकरी श्रीकृष्ण देशपांडे श्री कुलकर्णी सुदामा बुरे ओंकार खराडे सचिव दीपक माळवदकर क्लार्क शिवाजी आडत विजय मिरंगे अशपाक मुलांनी धैर्यशील माने देशमुख शंकरराव माने देशमुख राहुल माने देशमुख शरद साठे राजकुमार बनसोडे मेजर हिम्मतराव माने देशमुख विश्वजीत माने देशमुख सूर्यकांत भाकरे सचिन भाकरे दादासाहेब बकरे आनंद शिरसागर पसंत क्षीरसागर निखिल शिंदे दत्तात्रय माळी महेश साठे उत्तम साठे शिवाजी माने देशमुख संतोष माने देशमुख मोहन काशीद श्रीनिवास कदम पाटील तसेच सोसायटीची संचालक सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तहानलेल्या नागरिकांना थंडगार पाणी पाजण्यासाठी ८ फार्मा ग्रुपचा स्तुत्य उपक्रम : नगराध्यक्ष धरणे**

# पाणी म्हणजे जीवन, जारच्या थंडगार पाण्याची पाणपोई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : मार्च महिन्यातच सुरू झालेल्या कडक उन्हाळ्याच्या झळा नागरिकां पर्यंत पोहोचत आहेत या नागरिकांना थंडगार पाणी पाजण्यासाठी किंवा तहानलेल्या नागरिकांची तहान भागवण्यासाठी ८ फार्म ग्रुपच्या वतीने तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तुळजापूर तालुक्याचे धाडसी नेतृत्व सुनिल मालक चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने तहानलेल्या नागरिकांना थंडगार जार मधील पाणी पाजण्यासाठी पाणी म्हणजे जीवन असून, अशा या रखरखत्या उन्हात जनतेसाठी थंडगार जार चे पाणी देणे हा ८–फार्मा ग्रुप चा उपक्रम स्तुत्य असून अशा सामाजिक, उपक्रमाची समाजाला खूप गरज असल्याचे प्रतिपादन नळदुर्ग चे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले.



ते संजीवन मेडिकल स्टो.व ८–फार्मा ग्रुप च्या वतीने, सुनील चव्हाण यांच्या वाढ दिवसानिमित्त आयोजित पाणपोई उद्घाटन प्रसंगी बोलत होते, या वेळी पाणीपुरवठा सभापती नगरसेवक तानाजी जाधव, डॉ.जितेंद्र पाटील नगरसेवक रिझवान काझी,अभियंता स्वप्नील काळे, नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे,आदी मान्यवर उपस्थित होते, याच कार्यक्रमात नवोदय विद्यालयात प्रवेश मिळाल्याबद्दल आरोही सातपुते या विद्यार्थिनीचा शालेय साहित्य देऊन सत्कार करण्यात आला, या कार्यक्रमास भय्या हजारी, अमर भाळे,पद्माकर घोडके, बबन चौधरी,पत्रकार उत्तम बनजगोळे, पत्रकार शिवाजी नाईक, पत्रकार दादासाहेब बनसोडे, दिशा बँकेची व्यवस्थापक उमेश जाधव, प्रमोद जाधव, आदी मान्यवर उपस्थित होते तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संजय जाधव, गोविंद शिंदे, अजय अणदूरकर, जीवन मोजगे, गुणवंत मुळे, राम जाधव आदीनी परिश्रम घेतले.

# श्री शिवाजी महाविद्यालय अकोटची कु. प्रज्ञा वानखडे शोलो डान्समध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोला : नुकताच पार पडलेला अकोला जिल्ह्याचे खाकर्षण असलेला नरनाळा महोत्सव अकोट तालुक्यात पार पडला या महोत्सवामध्ये जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली नरनाळा महोत्सव पार पडला यामध्ये कला साहित्य संस्कृती या कार्यक्रमाची रेलचेल होती श्री शिवाजी महाविद्यालय अकोटची कुमारी प्रज्ञा राहुल वानखडे बीए भाग तीन ची विद्यार्थिनी हिने सोलो डान्स मध्ये भाग घेऊन जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला नुकताच तिचा वनविभागाने रोख रक्कम ११००० व सन्मानपत्र देऊन तिला सन्मानित केले श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुनील पांडे यांनी सुद्धा महाविद्यालयातर्फे तिचा सत्कार केला याप्रसंगी संगीत विभागाच्या डॉक्टर प्रतिभा पवित्रकार डॉक्टर उत्तरा तडवी डॉक्टर संतोष वावगे डॉक्टर मृणाल कडू मेकअप मन पायल शिरसाट मेकअप में सचिन तनुजा नारे असे कवी प्रशांत दामले व जिल्ह्यातील अनेक चाहत्यांनी तिचे अभिनंदन केले.



# इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम २०२७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी घेतला सखोल आढावा; अतिरिक्त निधीची तातडीने तरतूद करण्याची आवश्यकता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मुंबईतील इंदू मिल येथे उभारण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम विहित मुदतीत आणि अधिक गतीने पूर्ण करण्यासाठी राज्य शासन पूर्णपणे प्रयत्नशील आहे असे महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी आज येथे सांगितले.

श्री बनसोडे हे दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी गाझियाबाद येथील प्रख्यात शिल्पकार राम सुतार यांच्या कार्यशाळेला भेट दिली. इंदू मिल स्मारकासाठी तयार होत असलेल्या पुतळ्याच्या कामाची सविस्तर पाहणी केली आणि कामाच्या सद्यस्थितीचा सखोल आढावा घेतला.

पाहणीनंतर महाराष्ट्र सदन येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीवर सविस्तर माहिती दिली. स्मारकासाठी आवश्यक असणाऱ्या मुख्य धातूंच्या जागतिक दरात झालेल्या वृद्धीमुळे प्रकल्पाच्या मूळ निविदा दरांमध्ये आणि सध्याच्या वास्तविक खर्चामध्ये तफावत निर्माण झाली आहे. या अनपेक्षित दरवाढीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी अतिरिक्त निधीची तातडीने तरतूद करणे आवश्यक आहे.या वाढीव निधी संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. एमएमआरडीए मार्फत संबंधिताना वेळेत निधी उपलब्ध करून देण्याची विनंती शासन स्तरावर केली जाईल असेही श्री. बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

स्मारकाच्या प्रगतीबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, इंदू मिल येथे ३५० फूट उंचीचा भव्य पुतळा उभारण्यात येत असून, त्यापैकी साधारण ५० फूट उंचीचे काम (बूट आणि पँटचा भाग) पूर्ण झाले आहे. उर्वरित सुटे भाग तयार करण्याचे व ते जोडण्याचे काम शिल्पकार अनिल सुतार यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून युद्धपातळीवर सुरू आहे. सन २०२७ पर्यंत हे स्मारक पूर्ण करून अनुयायांसाठी खुले करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. हे स्मारक जागतिक स्तरावर एक महान श्रद्धास्थान आणि प्रेरणास्थळ ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# घाटकोपरमधील ट्रॅफिक, फेरीवाले व प्रदूषण समस्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसची प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज ; घाटकोपर पूर्व व पश्चिम परिसरातील वाढत्या ट्रॅफिक कोंडी, अनधिकृत फेरीवाले आणि प्रदूषणाच्या समस्यांबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे घाटकोपर पश्चिम तालुका अध्यक्ष हिराचंद्र सूर्यवंशी यांनी एन विभाग कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांकडे लेखी निवेदन सादर केले आहे.पत्राच्या अनुषंगाने या समस्यांवर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी निवेदन देताना म ुंबई प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव नलावडे, ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष सुरेश भालेराव, महिला जिल्हाध्यक्ष स्नेहा कुऱ्हाडे, घाटकोपर पश्चिम म हिला तालुका अध्यक्ष कांचन बडे, सुनील चव्हाण, नंदू पाटील, सुरेश साखरे, विजय गोरे आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जागृती नगर मेट्रो ते श्रेयस सिग्नल दरम्यान म ोठ्या प्रमाणात बस, ट्रक व टेम्पो यांची बेकायदेशीर पार्किंग होत असल्यामुळे वाह- तूक कोंडी निर्माण होते. परिणामी नागरिकांना दोन-दोन तास ट्रॅफिकमध्ये अडकून राहावे लागत आहे. तसेच घाटकोपर बस डेपो ते श्रेयस सिग्नल या मार्गावर अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या कामांमुळे दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून, त्यात कोणतीही सुधारणा होत नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

घाटकोपर पश्चिम रेल्वे स्थ- ानक परिसरात मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसत असल्याने रिक्षांचीही गर्दी वाढते आणि पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा उरत नाही, अशी समस्या स्थानिक नागरिकांनी मांडली आहे. याशिवाय, जगदूशानगर श्रेयस, पंतनगर, गरोडिया नगर या भागात सुरू असलेल्या बांधकामांदरम्यान प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळले जात नसल्यामुळे हवेत धुळीचे प्रम ाण वाढून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे तसेच घाटकोपर पश्चिममधील विविध रस्त्यांवर अनधिकृत फेरीवाल्यांचा वाढता अतिक्रमणाचा प्रश्नही गंभीर बनला असून,त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. सुरेश भालेराव जिल्हाध्यक्ष ईशान्य मुंबई यांनी प्रशासनाने या सर्व समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांना दिल- ासा द्यावा, अशी मागणी केली असून लवकरात लवकर ठोस उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

# कर्मयोगीच्या निसर्गरम्य प्रांगणात राज्यस्तरीय तंत्र परिषदेचे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मयोगी इन्स्टिट्यूट मध्ये २ एप्रिल रोजी संपन्न होणार करमटेक २०२६

विद्यार्थ्यांचे अभियांत्रिकी म धील ज्ञान वृद्धीत होऊन त्याला चालना व प्रोत्साहन देण्यासाठी कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथे गुरुवारी दिनांक २ एप्रिल २०२० रोजी कर्माटिक २०२६या राज्यस्तरीय तंत्र परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती म हाविद्यालयाची प्राचार्य डॉक्टर एस. पी. पाटील यांनी दिली

याबाबत ची अधिक माहिती देताना कमटेक २०२६ चे संयोजक डॉक्टर अभय उत्पाद म्हणाले कीकर्माटिक २०२६मध्ये इलेक्ट्रिकल्स अँड टेलिकमुनिकेशन कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, सिविल व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकीच्या ज्ञानावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. यामध्ये कोड फार्मासिस, टेक्नो रिक्स, इलेक्ट्रॉनिक्स क्विझ, ओ सर्किट सोडकु, ब्रिज मॉडेल मेकिंग, ग्रीन बिल्डिंग बेस्ट फॉर्म वेस्ट, प्रोजेक्ट एक्झिबिशन अशा विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांसाठी आकर्षक बक्षिसेस दिले जाणार आहेत. सर्व स्पर्धा राज्यस्तरीय स्तरावर होतील तसेच सदरच्या स्पर्धेमध्ये राज्यातील विविध नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातून जवळपास ५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होणार असून अभियांत्रिक व पॉलिटेक्निकल महाविद्याल सर्व शाखे- तील विद्यार्थी आपला सहभाग नोंदवला असे आव्हान प्राचार्य एस पी पाटील, फार्मट्रेक २०२६ चे संयोग डॉक्टर अभय उत्पात , व समन्वयक डॉक्टर एस व्ही एकलारकर यांनी केले आहे.

# सुधाकर रणदिवे लातुर येथे सुभाष चंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातुर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : लातुर येथे दि.२९ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र पो- लीस मित्र सोशल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने गौरव कर्तव्यांचा सत्कार समाज सेवकांचा या महोत्सवाअंतर्गत नेताजी सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ हा ईटकुर येथील सुधाकर रणदिवे यांना देण्यात आला. यावेळी सदरील कार्यक्रमाचे आयोजन हे दोन सत्रात ठेवण्यात आले होते. पहिल्या सत्रामध्ये सांस्कृतिक महोत्सवांचे उद्घाटन माजी खासदार डॉ. प्रा. ॲड,सुनील गायकवाड यांच्या व माननीय सौ सुनंदा वसंत तुगावकर शिंदे, अभिनेत्री प्रोड्युसर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी प्रमुख उपस्थितीमध्ये मा. श्रीमती मीनाक्षी पाखरे, श्री अभिजीत शिंदे, माननीय श्री राम चंद्र तांदळे, अनेश खान पठाण,श्री सिद्धार्थ भैय़ा कवठेकर,श्री शितल बलदोटा हे उपस्थित होते. यावेळी श्री गणेश नृत्य, मी रमाई बोलते, मॉ साहेब जिजाऊ, बाल शिवबा पाळणा, मी सावित्री ज्योती बोलते, देशभक्तीपर सादरीकरण, संमिश्रगीत, ला- वणी डान्स, शाहीर रामानंद मोरे, शाहिर रत्नदीप घाडगे, नटसम्राट गीत, आधी सादरीकरण करण्यात आले. तर दुसऱ्या सत्रामध्ये नेताजी सुभाष चंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ चे सर्व मानकरी यांना हा पुरस्कार वितरण करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी खा- सदार डॉ. प्रा. ॲड, सुनील जी बळीराम गायकवाड साहेब हो- ते, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय श्री सुधाकर बावरकर साहेब, माननीय आशाताई सुशील कुमार चिकटे, माननीय श्री. ॲड. लक्ष्मणराव शिंदे साहेब, माननीय श्री बाळकृष्ण पवार पळेकर, हे उपस्थित होते. तसेच मीनाक्षी पारखे, सुनंदा वसंत तुगावकर, पंकज भाऊ काटे, पद्माकर पाटील, श्रीराम घुले, शमशोद्दीन गाझी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे आयोजन भालचंद्र ब्लड बँक सभागृहात करण्यात आले होते. या वेळी सन्मान चिन्ह व ट्रॉफी देऊन सुधाकर रणदिवे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महादेव गपाट सर, व प्रा. सुरज मांदळे सर यांनी केले तर आभार ह भ प महादेव महाराज अडसूळ कळंब कर यांनी केले या कार्यक्रम ासाठी महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रम पार पाडण्यासाठी विशेष सहकार्य उषाताई धावारे, चंद्रकांत वायाळ, संतोष सोनवणे, आकाश कांबळे, गुलाम शेख, साहिल शेख, व या कार्यक्रमाचे आयोजक व संयोजक नियोजन कमिटीचे प्रमुख व महाराष्ट्र पो- लीस मित्र सोशल असोसिएशन चे संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन हे होते.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात बीए, बीकॉम व बीएससी च्या विद्यार्थ्यांना निरोप

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील हृदयद्रावक आठवणीनी विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महाविद्यालयात मित्रांसोबत दंगा मस्ती केली त्यातून ऋणानुबंध जुळले, शिक्षकांनी केलेले अध्यापन हृदयाला जाऊन भिडले, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास केला, संदर्भ ग्रंथातून घटनांचे धागेद- ोरे उलगडले गेले, त्यामुळेच स्पर्धा परी- क्षेत अव्वल येण्याची स्वप्ने पाहिली, ती साकारण्यासाठी आता परिश्रम घेणार आणि महाविद्यालयास गोल्ड मेडल मि ळवून देणार अशी शपथ घेत बीए,बीकॉम व बीएस्सी च्या विद्यार्थ्यांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयाचा निरोप घेतला. यावेळी हृदय द्रावक आठवणीने अक्षरशः विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम ाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी उपस्थित होते.




यावेळी बोलताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, पुढील आयुष्य हे स्पर्धेचे आहे, त्यासाठी मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास आवश्यक आहे. आयुष्यात मूल्यांची जपणूक करा. प्रामाणिकपणा, शिस्त, आणि जबाबदारी या गुणांमुळेच तुमची प्रतिमा उंचावणार आहे. तुमच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी धैर्याने पुढे जा. तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. तुम्ही आपल्या यशाने कुटुंबाचे, महाविद्यालयाचे आणि समाजाचे नाव उज्ज्वल करा असा संदेश दिला.

पुनम कोकळगी म्हणाल्या की, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर यश, समाधान आणि आनंद मिळवण्यासाठी प्रयत्न करा आमचे आशीर्वाद सदैव तुमच्यासोबत आहेत.

प्रारंभी सानिया शेख, पायल कांबळे, प्रा भीम सोनकांबळे, डॉ शितल झिंगाडे-भस्मे, सौरभ भस्मे, राजशेखर पवार, यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन समर्थ पवार यांनी केले तर आभार शकुंतला कोरे यांनी मानले.

# के. बी. पी. महाविद्यालयातील सरस्वती कौलगे हिची आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : कर्मवीर भाऊराव पाटील म हाविद्यालय, पंढरपूर येथील विद्यार्थिनी सरस्वती कौलगे हिची आंतर विद्यापीठ (राष्ट्रीय ) खो-खो स्पर्धे साठी निवड झाली आहे. ही स्पर्धा मध्य प्रदेश राज्यातील रेवा येथे आयोजित करण्यात येणार असून, तिच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

सरस्वती कौलगे हिने आपल्या सातत्यपूर्ण सराव, चिकाटी व उत्कृष्ट खेळाच्या जोरावर ही निवड मिळवली असून, तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयातर्फे तिचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव यांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागाचे उपप्राचार्य सर्व विभाग प्रमुख व जिमखाना विभागातील प्रा. विठ्ठल फुले, प्रा.मनोज खपाले,प्रा. अनिल परमार, तसेच जिमखाना कमिटी सदस्य डॉ. भारती सुडके उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या वतीने सरस्वती कौलगे हिच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत असून, आगामी स्पर्धेत ती उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.